**स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com

---

**प्रेसनोट** दिनांक:- २५/०२/२०१७

## सास-याचा खुन करणारा फरार आरोपी स्थानिक गुन्हे शाखेचे जाळयात

---

वावी पोलीस स्टेशन । गु र न १२४/२०१३ भादंवि कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल होता. सदर गुन्ह्यातील आरोपी नामे सोमनाथ फुलाजी मोरे, रा खंबाळे, ता सिन्नर याने दि १९ ऑगस्ट २०१३ रोजी नांदूर शिंगोटे शिवारात त्याचा सासरा नामे आत्माराम सूर्यवंशी हा आरोपीचे पत्नीस नांदावयास पाठवत नाही याचा राग मनात धरून त्याने त्याचे सासऱ्यास जीवे ठार मारले होते. सदर आरोपी हा गुन्हा घडल्यापासून फरार होता.

नाशिक ग्रामीण जिल्ह्याचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो**, अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड सो** यांनी जिल्हा अभिलेखावरील फरार आरोपीतांना अटक करणे बाबत आदेश दिले होते. त्याप्रमाणे स्थागुशाचे **पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी त्यांचे पथकास फरार आरोपींचे सध्याचे ठाव ठिकाणाबाबत माहिती काढणे बाबत मार्गदर्शन करून सूचना दिल्या होत्या. त्यानुसार स्थागुशाचे पथकातील पोउपनिरी स्वप्नील नाईक, पोहवारवी वानखेडे, पोना दिलीप घुले, प्रीतम लोखंडे, पोकॉ किरण काकड, हेमंत गिलबिले, प्रदीप बहिरम अशांचे पथकाने दि. २६/०२/२०१८ रोजी वरील गुन्ह्यातील फरार आरोपी हा चांदवड तालुक्यात वास्तव्यास असले बाबत खात्रीशीर माहिती मिळालेवरून **आरोपी नामे सोमनाथ फुलाजी मोरे, वय २७, रा खंबाळे, ता सिन्नर** यास बोपाने, ता चांदवड परिसरातून शिताफीने ताब्यात घेतले.

सदर आरोपी हा गुन्हा घडल्यापासून नंदुरबार जिल्ह्यात तसेच नाशिक जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी नांव बदलून राहत होता, स्थागुशाचे पथकाने मिळविलेल्या गुप्त माहिती नुसार तो सध्या चांदवड तालुक्यातील बोपाने गावात वास्तव्यास असलेबाबत समजलेवरून पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी त्यास ताब्यात घेतले आहे. सदर आरोपी हा सुमारे ०५ वर्षांपासून फरार होता.